“राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ व केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माध्यमिक स्तरावरील भाषा विषयांच्या अभ्यासक्रमाचा तुलनात्मक अभ्यास”.

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पीएच.डी. विषय मान्यतेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड
येथे सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक
श्री. काचगुंडे श्रीहरी हारीचंद्र
एम.ए. एम. एड. (इंग्रजी, इतिहास)
नेट सेट, पीएच. डी. अपीअर.

मार्गदर्शक
डॉ. केशव वामनराव इंगोले.
प्राचार्य राष्ट्रमाता अध्यापक महाविद्यालय,
लोहा, ता. लोहा, जि. नांदेड

संशोधन केंद्र.
शिक्षणशास्त्र संकुल (एम.एड.)
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वर्ष
२०२२-२०२३

अनुक्रमणिका

अ.क्र.	**मुद्यांचा तपशील**	**प्रष्ठ क्र.**
1.	प्रस्तावना	3
2.	राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020	4
3.	एस.एस.सी. (S.S.C.)बोर्ड भाषा संकल्पना	4
4.	सी.बी.एस.सी. बोर्ड (C.B.S.C.)	5
5.	माध्यमिक शिक्षण संकल्पना	6
6.	संशोधनाची गरज	6
7.	संशोधनाचे महत्व	7
8.	समस्या विधान	7
9.	कार्यात्मक व्याख्या	7
10.	संशोधनाची उद्दिष्टे	8
11.	संशोधनाची गृहीतके	9
12.	संशोधनाची परिकल्पना	9
13.	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	10
14.	संशोधनाची पद्धती	11
15.	संशोधनाची जनसंख्या	11
16.	संशोधनाचा नमुना/न्यादर्श	11
17.	माहिती संकलनाची साधने	12
18.	सांख्यिकीय साधने	12
19.	निष्कर्ष व शिफारशी	13
20.	संशोधनाचा कृतिकार्यक्रम	13
21.	संशोधनाचे वेळापत्रक	13
22.	संशोधनाचे अंदाजपत्रक	14
23.	संदर्भ ग्रंथ	14

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ व केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माध्यमिक स्तरावरील भाषा विषयांच्या अभ्यासक्रमाचा तुलनात्मक अभ्यास"

1. प्रस्तावना :

सध्याचे युग हे माहिती आणि आणि तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जात आहे. विश्वाच्या सर्व क्षेत्रांमध्ये झपाट्याने बदल घडून येत आहेत. त्याला शिक्षण सुद्धा अपवाद नाही. भारतीय शिक्षणाचा पाया जरी इंग्रजांनी घातला असला, तरी आता त्याच्या व्यापक स्वरूपात खूप मोठा बदल झाला आहे. मेकॉलेची मर्यादित शिक्षण देणारी यंत्रणा नष्ट होऊन स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा क्रांतिकारकपणे विस्तार झाला आहे. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने विविध समित्या, आयोग हे भारतीय शिक्षणाचा विकास व विस्तार करण्यासाठी नेमले होते त्यामुळे शिक्षण प्रक्रिया प्रचंड वेगाने विकसित झाली 2020 झाली. भारत सरकारने नवीन शैक्षणिक धोरण राष्ट्राला समर्पित केले. कारण शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचा व उन्नतीचा मोठा आधार आहे भविष्य काळातील समाजाची व देशाची वाटचाल प्रभावी, व आत्मविश्वासपूर्वक होण्यासाठी बदलत्या गरजा नुसार शिक्षण व्यवस्थेमध्ये बदल करणे गरजेचे ठरते.

केंद्र शासनाने वेळोवेळी शिक्षणाच्या विकास व विस्तारासाठी सकारात्मक पावले उचलेली आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे त्यापैकी एक आहे. या धोरणाने आधुनिक शिक्षणाचा खूप व्यापक प्रमाणात विचार केलेला आहे. भारत देशाचा विचार केला, तर येथे आपल्याला खूप मोठ्या प्रमाणात विविधता दिसून येते. भाषा, संस्कृती, वेशभूषा, सणउत्सव, शिक्षण इत्यादी. सर्व घटकाला एका धाग्यात बांधण्याचे साधन म्हणजे शिक्षण होय. बहुभाषा व बहुसंस्कृती हा आमचा सर्वात मोठा आधार आहे.

आज आम्हाला आमच्यातले भाषिक संघर्ष सांस्कृतिक संघर्ष, वर्ण, वंशभेद इत्यादी टाळायचे असतील, तर खूप मोठ्या व्यापक प्रमाणात विचार करण्याची गरज आहे. आणि हे कार्य सक्षमपणे करण्याची जबाबदारी ही देशातील शिक्षण व शिक्षक यांनी आपल्या खांद्यावर घेण्याची वेळ आली आहे. देशामध्ये विविध सक्षम संस्थांचा पाया भक्कम केला, तर या समस्या सुटू शकतील. देशांमध्ये स्थापन झालेली विविध शिक्षण मंडळे शिक्षण संस्था व विद्यापीठे यांचा दर्जा उंचावला गेला पाहिजे. त्यांना अधिक स्वायत्तता व स्वातंत्र्य दिले गेले पाहिजे त्यासाठी संशोधनाची गरज जाणवू लागते. एक नवसंशोधक म्हणून एस.एस.सी. बोर्डाच्या माध्यमिक स्तरावरील व सी.बी.एस.सी. बोर्डाच्या माध्यमिक स्तरावरील भाषांचा अभ्यासक्रमातील समावेश या संदर्भात संशोधन किंवा तुलनात्मक अभ्यास करण्यास संशोधक उत्सुक आहे.

2) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (2020):

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे 29 जुलै 2020 रोजी भारत सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केले. नवीन भारताच्या निर्मितीसाठी शिक्षण हा या धोरणाचा मुख्य हेतू होता. हे शैक्षणिक धोरण 1986 शैक्षणिक धोरणाची जागा घेईल. भारताच्या ग्रामीण व शहरी जीवनामध्ये विशेषता पायाभूत शिक्षणाच्या सुविधांमध्ये २०३० पर्यंत परिवर्तन घडवून आणणे हा मुख्य हेतू आहे.

शिक्षण हा विषय भारतीय राज्यघटनेतील समवर्ती सूची मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. नवीन शैक्षणिक धोरण हे विद्यार्थी केंद्रित झाले आहे. व्यावसायिक व नोकरी केंद्रित दृष्टिकोन यामध्ये

परिवर्तन होऊन विद्यार्थी हा केंद्रस्थानी आला आहे. हे धोरण ठरवणाऱ्या समितीचे प्रमुख म्हणून इस्त्रोचे माजीप्रमुख श्री कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आले आहे. या समितीतील सदस्यांनी देशभरातील नागरिक, प्रशासक, शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ, प्राध्यापक, व तज्ञराजकारणी यांच्याशी चर्चा करून या धोरणाचा अंतिम मसुदा तयार केला.

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील प्रमुख तरतुदी.

1) शिक्षणावरील राज्याचा खर्च %3वरून %6पर्यंत वाढवणे.

2) इयत्ता पाचवी पर्यंत मातृभाषाला शिक्षणाचे माध्यम म्हणून मान्यता दिली.

3) संस्कृत इतर भाषावरही लक्ष केंद्रित केले गेले.

4) तीन भाषा सूत्राचा स्विकार करण्यात आला.

5) 5+3+3+4 या नवीन शैक्षणिक सूत्राचा स्वीकार करण्यात आला आहे.

6) विद्यार्थ्यांना विविध भाषा शिकण्याची संधी प्राप्त झाली.

7) अंतरशाखीय अभ्यासक्रम निवडीसाठी विध्यार्थ्यांना संधी प्राप्त झाली.

3) एस.एस.सी.(S.S.C) बोर्ड भाषा संकल्पना:

Secondary School Certificate असा त्याचा विस्तृत अर्थ होतो. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार भारतातील प्रत्येक राज्यात याची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रात 1 जानेवारी 1966 पासून ते कार्यरत आहे. बोर्डाच्या माध्यमातून विध्यार्थ्याच्या अभ्यासक्रम परीक्षाविषयक बाबीचे मूल्यमापन होते.

- **एस.एस.सी. बोर्डाची उधिष्टे:**

1) विद्यार्थ्यांचे वस्तुनिष्ठ व तटस्थपणे मूल्यमापन करणे.

2) शिक्षकाला अध्यापन विषयक येणाऱ्या अडचणी दूर करणे.

3) इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षेचे आयोजन करून, त्यांना प्रमाणपत्र देणे.

4) विद्यार्थ्यांसाठी नवनवीन प्रत्यक्ष उपक्रम राबवणे.

5) शिक्षकांसाठी वेळोवेळी उद्बोधन वर्ग, उजाळा वर्ग, व कृती संशोधन शिबिराचे आयोजन करणे.

- **भाषा संकल्पना:**

भाषा ही विद्यार्थ्याच्या आत्मप्रकटीकरणाचे साधन आहे. भाषेच्या माध्यमातून व्यक्ती विद्यार्थी आपले मत समाजासमोर आत्मविश्वासपूर्वक मांडत असतो. एस.एस.सी. बोर्ड मार्फत बहुभाषिक दृष्टिकोन स्वीकारण्यात आलेला आहे. देशातल्या वेगवेगळ्या भाषेतून पाठ्यपुस्तके प्रसिद्ध केले जात आहेत, व विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याचे संधी देण्यात येत आहे. खालील यादीत दिलेल्या भाषा एस.एस.सी. बोर्ड मार्फत अध्यापनासाठी निवड केली आहे.

- **एस.एस.सी बोर्डाने निवडलेल्या भाषा.**

6) मराठी 2) हिंदी 3) गुजराती. 4) कन्नड 5) तेलगू 6) सिंधी 7) भारतीय संविधानात मान्य केलेल्या इतर भाषा.

4) सी.बी.एस.सी. बोर्डाचा भाषाविषयक दृष्टीकोन:

केंद्रीय शिक्षण मंडळामार्फत देश विदेशातील 40 पेक्षा जास्त अधिक भाषा मधून अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकाचे वितरण केले आहे. भाषा हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे साधन म्हणून ओळखले जाते. विद्यार्थी स्वतःचे विचार अभिव्यक्ती, छंद, आवड, भाषेच्या माध्यमातून जोपासत असतात. म्हणून केंद्रीय शिक्षण मंडळामार्फत व्यक्तीच्या भाषिक विकासाकडे कटाक्षाने लक्ष दिले जाते. अभ्यास क्रमामध्ये भाषिक विकासासाठी खालील भाषांचा समावेश करण्यात आला .

1) मराठी

2) हिंदी

3) इंग्रजी

4) उर्दू

5) कन्नड

6) तमिळ

7) राज्यघटनेने मान्य केलेल्या सर्वभाषा.

5) माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रम संकल्पना:

विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये अभ्यासक्रमाला अनन्यसाधारण असे स्थान आहे अभ्यासक्रम हे शिक्षकाच्या हातातील प्रभावी असे साधन आहे. ज्याच्या वापरातून समाजाच्या मूलभूत संरचनेमध्ये व्यापक स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणणे शक्य झाले आहे. लॅटिन भाषेमध्ये करिक्युलम याचा अर्थ शर्यतीचे मैदान असा होतो.

अभ्यासक्रमामुळे शिक्षकाला त्याच्या विद्यार्थ्यांना घडवण्याचे एक सुवर्णसंधी प्राप्त होत असते. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून भविष्यकालीन अपेक्षित समाजाचे चित्र रेखाटता येते . शिक्षणतज्ञ, विचारवंत, शास्त्रज्ञ हे अभ्यासक्रम निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये महत्त्वाचे घटक ठरतात.

6) संशोधनाची गरज:

आधुनिक युगामध्ये शिक्षण प्रक्रियेमध्ये गुणात्मक स्वरूपाचे बदल घडून आणायचे असतील, तर संशोधनाचा स्तर उंचावणे गरजेचे आहे भाषाचा तुलनात्मक अभ्यास ही नवीन युगाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची संकल्पना आहे. संशोधकाला या क्षेत्रामध्ये संशोधन करण्याची गरज पुढील प्रमाणे वाटते.

1) भाषाच्या संदर्भात विद्यार्थ्यांना आवड निर्माण करणे.

2) शालेय स्तरावरील भाषा अभ्यासक्रमाचा दर्जा उंचावणे.

3) विद्यार्थ्यांमध्ये विविध भाषिक कौशल्याचा विकास होण्यास मदत करणे.

4) भाषेच्या क्षेत्रातील नवनवीन प्रवाह विकसित करण्यास मदत करणे.

5) भाषेच्या तुलनात्मक अभ्यासातून विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक व वस्तुनिष्ठ दृष्टिकोन विकसित करणे.

6) विद्यार्थ्यांच्या विविध भारतीय भाषाविषयक अभिरुची व दृष्टिकोन विकसित करणे.

7) भाषा विषयातील संशोधनाचे विविध क्षेत्रे जाणून घेणे.

8) शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये भाषा व साहित्य यांची अभिरुची निर्माण करणे.

अशाप्रकारे भाषाविषयक क्षेत्रामध्ये संशोधनाची गरज निर्माण होत असल्याचे दिसून येते.

7) संशोधनाचे महत्त्व :

कोणतेही संशोधन संशोधनासाठी विषयाचे महत्त्व लक्षात घ्यावे लागते. त्यानुसारच संशोधक संशोधन करीत असतो. प्रस्तुत संशोधनातून संशोधकाला विद्यार्थ्यांचा भाषाविषयक दृष्टिकोन लक्षात किंवा जाणून घ्यायचा आहे. कारण भाषा ही विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती व प्रकटीकरणाचे एक प्रमुख साधन आहे. म्हणून संशोधनाचे महत्त्व पुढील प्रमाणे सांगता येईल.

1) विद्यार्थ्यां मध्ये भाषाविषयक अभिव्यक्तीचा विकास संदर्भात.

2) विद्यार्थ्यांना भाषेचे रसग्रहण आस्वाद घेण्याच्या संदर्भात महत्व.

3) विविध भाषा मधील संघर्ष सोडवण्या संदर्भामध्ये महत्व.

4) भाषिक विविधतेतून एकात्मता निर्माण करण्यासंदर्भात महत्व.

5) भाषाचा व्यवहारात अधिकाधिक वापर करण्यासंदर्भात विकसित दृष्टिकोन.

अशाप्रकारे संशोधनाचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

8) समस्या विधान:

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ व केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माध्यमिक स्तरावरील भाषा विषयांच्या अभ्यासक्रमाचा तुलनात्मक अभ्यास"

9) कार्यात्मक व्याख्या :

संशोधन प्रक्रियेमध्ये संशोधकाला संशोधन कार्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, म्हणून अगोदरच सर्व शब्दाच्या व्याख्या कार्यात्मक स्वरूपामध्ये मांडाव्या लागतात त्यामुळे संशोधन प्रक्रियेमधील अडथळे दूर करता येतात.

1) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण:

भारत सरकारने इस्त्रोचे माजी प्रमुख श्री कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेले शिक्षण विषयक आयोग म्हणजेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण होय.

2) सन 2020 :

इंग्रजी वर्षातील एक वर्ष म्हणजे 2020हे वर्ष होय.

3) एस.एस.सी.बोर्ड :(S.S.C)

कोठारी शिक्षण आयोगाच्या शिफारसीनुसार एक जानेवारी 1966रोजी महाराष्ट्रात स्थापन झालेली एक स्वायत्त संस्था म्हणजे एसएससी बोर्ड होय.

4) सी.बी.एस.सी.बोर्ड. : C.B S C)

स्वातंत्र्यपूर्व काळापासून माध्यमिक स्तरावरील शिक्षणाचे व्यवस्थापन आयोजन व नियोजन करणारी यंत्रणा म्हणजे सी.बी.एस.सी बोर्ड होय.

5) माध्यमिक स्तर:

नवीन शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता नववी व दहावीच्या वर्गाला माध्यमिक स्तराचे संबोधले जाते.

6) भाषा विषय :

माध्यमिक स्तरावरील त्रिभाषा सूत्रानुसार प्रत्येक राज्यामध्ये दिले गेलेले भाषा विषयाचे ज्ञान म्हणजे भाषा विषय होय.

7) अभ्यासक्रम.

लॅटिन भाषेमध्ये अभ्यासक्रमाचा उल्लेख हा शर्यतीचे मैदान असा केला जातो.

8) तुलना:

दोन चलांमधील अथवा दोन घटकांमधील फरक हा तुलनात्मक स्वरूपामध्ये पाहिला जातो याला तुलना असे म्हणतात.

10) संशोधनाची उधिष्टे:

संशोधन कार्याची प्रभावी यशस्वीता ही अचूक व प्रभावी संशोधनाच्या उद्दिष्टांवर अवलंबून असते. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने खालील उद्दिष्टे नियोजित केली आहेत.

1) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा भाषा विषयक कल आवड जाणून घेणे.

2) विद्यार्थ्यांमध्ये दैनंदिन जीवनामधील भाषेचे असणारे महत्त्व अधोरेखित करणे किंवा पटवून देणे.

3) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये भाषेचे नवीन प्रवाह रुजविण्यासंदर्भात चर्चा करणे.

4) माध्यमिक स्तरावरील शिक्षकांमध्ये भाषा विषयाचे नवीन ज्ञान प्रवाह विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे.

5) भाषाविषयक पाठ्यपुस्तके यांच्या संदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती करून चिकित्सक दृष्टिकोन विकसित करणे.

6) विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक दृष्टिकोनाच्या निर्मितीसाठी विविध प्रयोग कृती कार्यक्रम राबवणे.

7) विद्यार्थ्यांना भाषेच्या अभ्यासातून आत्मनिर्भर बनवणे व प्रभावी भाषा संप्रेषण विकासास चालना देणे..

8) विद्यार्थ्यांना विविध भाषा संप्रेषण कौशल्य यामध्ये व प्रकटीकरणांची तसेच सरावाची संधी देणे.

11) संशोधनाची गृहीतके:

संशोधकाला संशोधन कार्यादरम्यान होणाऱ्या विविध शारीरिक मानसिक बदलाची दखल घ्यावी लागते. अन्यथा संशोधन कार्य हे प्रभावित होऊ शकते अथवा त्याच्यामध्ये अडथळे येण्याची शक्यता अधिक असते कारण मानवी मन हे नेहमी एकसारखी प्रतिक्रिया देत नाही त्याच्यावर मानसशास्त्रीय तत्वाचा प्रभाव पडत असतो.

भूक, तहान, उत्साह ,थकवा ,कंटाळा इत्यादी चले संशोधन कार्यादरम्यान येऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये घडून येणारे जैविक व मानसशास्त्रीय बदल संशोधनाला प्रभावित करण्याची व निष्कर्षावर प्रभाव टाकण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे भविष्य काळातील धोके लक्षात घेऊन संशोधकाला काही गोष्टी गृहीतकामध्ये मांडाव्या लागतात त्याला संशोधनाची गृहितके असे म्हणतात..

12) संशोधनाची परिकल्पना:

संशोधन कार्याला दिशा देण्याचे महत्वाचे कार्य हे परिकल्पना निश्चित करीत असते. संशोधक संशोधन समस्येचे निगडित विविध तर्क किंवा कारणे शोधत असतो, त्याला परिकल्पना असे म्हणतात संशोधक स्वतः काहीतरी मांडणी करून त्याचा शोध घेत असतो. थोडक्यात परिकल्पना म्हणजे संशोधन समस्येचे संभाव्य उत्तर असे गृहीत धरले जाते. परिकल्पनेच्या संदर्भात अनेक विचारवंतांनी व्याख्या केल्या आहेत त्यापैकी आपण एक व्याख्या पाहू.

***बिलाईके यांच्या मते:**

परिकल्पना म्हणजे संशोधन समस्येचे तात्पुरते उत्तर होय अशी बिलायके यांची परिकल्पनेची व्याख्या सांगते.

*** परिकल्पनेचे प्रकार:**

1) संशोधन परिकल्पना.

2) शून्य परिकल्पना.

3) दिशादर्शक परिकल्पना.

सदर संशोधन कार्यासाठी संशोधकाने संशोधन परिकल्पनेचा वापर करण्याचे निश्चित केले आहे.

*** संशोधन परिकल्पना.**

एस.एस.सी. बोर्डाच्या व सी.बी.एस.सी. बोर्डाच्या माध्यमिक स्तरावरील भाषांचा तुलनात्मक अभ्यास केला असता सकारात्मक प्रभाव विद्यार्थ्यांवर पडतो.

13) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

संशोधन कार्य करीत असताना संशोधकाला संशोधन समस्येचे निगडित काही व्याप्ती व मर्यादा निश्चित करावी लागते अन्यथा संशोधन समस्येच्या निष्कर्षावर त्याचा प्रभाव पडण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून संशोधकाने येथे संशोधनाच्या काही व्याप्ती व मर्यादा निश्चित केले आहेत.

1) प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक स्तरापर्यंत मर्यादित आहे.

2) सदर संशोधन हे सी.बी.एस.सी. बोर्डा पुरते मर्यादित आहे.

3) सदर संशोधन हे एस. एस. सी. बोर्डापुरते मर्यादित आहे.

4) प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्र राज्यापुरते मर्यादित आहे.

5) प्रस्तुत संशोधनामध्ये दोन्हीही बोर्डाच्या मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचा संशोधन कार्यासाठी विचार करण्यात आला आहे.

6) प्रस्तुत संशोधन हे दोन्हीही बोर्डाच्या आठवी नववी दहावी वर्गापूरते मर्यादित आहे.

7) प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधन पद्धती मधील सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा विचार करण्यात आला आहे.

8) प्रस्तुत संशोधन हे यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या नमुन्यानुसार शाळा व शिक्षकापुरते मर्यादित आहे.

14) शैक्षणिक संशोधनाची पद्धती:

संशोधन प्रक्रियेची यशस्वी वाटचाल होण्यासाठी संशोधकांनी संशोधनाची योग्य पद्धती निवडणे गरजेचे आहे त्यामुळे संशोधकाला संशोधनाच्या संदर्भात योग्य दिशा व निर्देश मिळतो संशोधनाच्या खालील तीन प्रमुख संशोधन पद्धती आहेत.

1) ऐतिहासिक संशोधन पध्दती.

2) सर्वेक्षण संशोधन पद्धती.

3) प्रायोगिक संशोधन पद्धती.

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्याचे नियोजित

केले आहे. कारण प्रस्तुत संशोधन विषयाच्यादृष्टीने सर्वेक्षण संशोधन पद्धती अभ्यासासाठी संशोधकाला समर्पक वाटते.

15) संशोधनाची जनसंख्या:

जनसंख्या म्हणजे संशोधक संशोधन ज्या गटावर ज्या गटावर लोकसंख्येवर करणार आहे असा गट म्हणजे जनसंख्या होय .उदा. महाराष्ट्रातील शाळांची संख्या शिक्षकांची संख्या विद्यार्थ्यांचे संख्या यानुसार संशोधक त्याच्या संशोधनासाठी पर्याप्त ठरेल इतका जनसंख्येचा प्राथमिक गट निवडत असतो त्याला जनसंख्या असे म्हणतात.

16) संशोधनाचा नमुना/न्यादर्श:

संशोधन प्रक्रियेमध्ये संपूर्ण जनसंख्येला संशोधनामध्ये समाविष्ट करता येत नाही, त्यामुळे संशोधकाला जनसंख्येचे प्रतिनिधित्व करणारा एखादा गट निवडावा लागतो. ज्यामध्ये जनसंख्येचे सर्व गुणवैशिष्ट्ये एकवटलेली असतात अशा गटाचा संशोधक नमुना किंवा न्यादर्श म्हणून उपयोग करतो. नमुना निवडीच्या खालील दोन प्रमुख पद्धती आहेत.

1) **संभाव्यता आधारित न्यादर्श:**

1) सुगम यादृच्छिक नमुना निवड.

2) क्लस्टर नमुना निवड.

3) श्रेणीबद्ध नमुना निवड.

4) वर्गीकर्त यादृच्छिक नमुना निवड.

2) **असंभाव्यता आधारित न्यादर्श.**

1) सहज प्राप्त नमुना निवड.

2) सहेतुक नमुना निवड.

3) स्नो बोल नमुना निवड.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सुगम यादृच्छिक पद्धतीच्या लॉटरी पद्धतीने नमुना निवड करण्याचे निश्चित केले आहे. यामध्ये संशोधक चिट्ट्या टाकून शाळांचे किंवा प्रतिसादकांची निवड करणार आहे.

17) संशोधनाची माहिती संकलनाची साधने:

संशोधन कार्याचे निष्कर्ष अचूक येण्यासाठी संशोधनाचे विश्लेषण करणारी माहिती संकलनाची साधने ही अचूक वस्तूनिष्ठ असली पाहिजेत तेव्हाच संशोधनाचे विश्लेषण करणे व अचूक निष्कर्ष काढणे शक्य होते प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खालील साधनांचा समावेश केला आहे.

1) प्रश्नावली.

2) निरीक्षण सूची.

3) पडताळा सूची.

4) चेकलिस्ट.

अश्या विविध साधनांचा वापर माहिती संकलनासाठी करणार आहे.

18) संशोधनाची संख्याकीय साधने:

संशोधकाला माहिती संकलन केल्यानंतर त्याचे अचूक विश्लेषण करण्यासाठी काही संख्याकीय साधनांचा वापर करावा लागतो. त्यामुळे अचूक निष्कर्ष प्राप्त होण्यास अडथळा येत नाही. सदर संशोधन कार्यासाठी संशोधकाने खालील साधनांची निवडकेली आहे.

1) मध्यमान.

2) बहुलक.

3) मध्यगा.

4) टी चाचणी.

19) निष्कर्ष व शिफारशी:

संशोधन कार्याचे यश म्हणजे संशोधकाला प्राप्त होणारे निष्कर्ष असतात ते संशोधन कार्याचे अंतिम फलित असते. प्रस्तुत संशोधन कार्याचे निष्कर्ष हे संशोधकाकडून अचूकपणे मांडले जातील.

20) संशोधनाचा कृतिकार्यक्रम:

1) संशोधन समस्या निश्चिती.

2) संशोधनकार्यासाठी न्यादर्श निश्चिती.

3) संदर्भ साधनांची निवड.

4) समस्या निगडित माहिती संकलन.

5) प्रश्नावली निर्मिती.

6) प्रतिसादकाना प्रश्नावली देणे.

7) माहिती विश्लेषण.

8) निष्कर्ष व शिफाराशी.

21. संशोधनाचे वेळापत्रक :

१) संशोधन समस्या निवड	२० दिवस

२) संशोधन आराखडा तयार करणे	३० दिवस
३) संबंधित साहित्यचा आढावा	१० दिवस
४) संशोधन साधन निर्मिती	२० दिवस
५) माहिती संकलन करणे	२० दिवस
६) माहिती संकलन व विश्लेषण	३० दिवस
७) निष्कर्ष व शिफारसी	१० दिवस
८) अहवाल लेखन करणे	६० दिवस
९) सादरीकरण	१० दिवस
	एकूण = २१० दिवस

22. संशोधनाचे अंदाजपत्रक :

१) संशोधन समस्या निश्चिती	२००० रू
२) क्षेत्र भेटी	३००० रू
३) माहिती संकलन	५००० रू
४) संबधित साहित्याचा आढावा	२००० रू
५) माहिती विश्लेषण	२००० रू
६) निष्कर्ष मांडणी	२००० रू
७) अहवाल लेखन	१०००० रू
एकूण	२६००० रू

23. संर्दभ ग्रंथ सूची :

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण भारत सरकार माहिती पुस्तिका.

२) बेस्ट. जे. डब्लू अॅण्ड खान, रिसर्च इन एज्युकेशन, न्यु दिल्ली, प्रॅक्टीस हॉल ऑफ इंडीया पी. व्ही. टी.

३) मिश्रा आर., (2005), (एज्युकेशनल रिसर्च ए. पी.एच. पब्लिसिंग, कॉरपोरेशन न्यु दिल्ली.

४) रिर्सच मेथडॉलॉजी – रणजितसिंग

५) रिर्सच मेथडॉलॉजी - विनायक भिंताडे.

संशोधकाचे नाव — **मार्गदर्शक**

काचगुंडे श्रीहरी हारीचंद्र

डॉ. केशव वामन इंगोले.
प्राचार्य राष्ट्रमाता अध्यापक महाविद्यालय,
लोहा, ता. लोहा, जि. नांदेड